# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date 03 October 2024
# Time 11.00 to 11.05 AM
# Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक: ०३ ऑक्टोबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.

****

शारदीय नवरात्रोत्सवाला आजपासून प्रारंभ झाला असून, सर्वत्र भक्तिमय वातावरणात देवीची आराधना केली जात आहे. नवरात्रीच्या नऊ दिवसात देवीची नऊ रुपांमध्ये पूजा केली जाते. सजावटीसह लागणारं साहित्य, मातीचे घट, झेंडूची फुलं यांच्या खरेदीसाठी सर्व बाजारपेठांमध्ये गर्दी दिसून येत आहे.

कोल्हापूर इथल्या करवीर निवासिनी श्री अंबाबाई देवीच्या मंदिरात आज सकाळी घटस्थापना करण्यात आली. धाराशिव जिल्ह्यात तुळजापूर इथल्या श्री तुळजाभवानी मातेच्या मंदीरात आज दुपारी घटस्थापना होईल, तत्पूर्वी आज पहाटे देवीची मंचकी निद्रा संपून सिंहासनावर प्रतिष्ठापना करण्यात आली. या नवरात्र महोत्सवात विविध अलंकार महापूजा मांडण्यात येणार आहेत.

साडेतीन शक्तीपीठांपैकी अर्धपीठ असलेल्या वणी इथल्या श्री सप्तशृंगी देवी देवीच्या मंदिरात आज पहाटे देवीची महापूजा करण्यात आली आणि नवरात्र उत्सवाचा आरंभ झाला. श्री क्षेत्र माहूर इथं देशभरातील भाविक नवरात्रात दर्शनासाठी येतात. देवीला विविध नऊ रंगाचं पैठणी महावस्त्र घालण्यात येतं.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना नवरात्रोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. शक्ति वंदनेला समर्पित हा उत्सव सर्वांसाठी मंगलमय होवो, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

****

सुतकताई करणाऱ्या कामगारांच्या वेतनात २५ टक्के आणि माग विणकर्यांच्या वेतनात सात टक्के वाढ कालपासून लागू करण्यात आल्याचं केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयानं जाहीर केलं आहे. खादी उत्पादनांवर २० टक्के आणि ग्रामोद्योग उत्पादनांवर दहा टक्के सवलत देण्यात आली असल्याचं, खादी आणि ग्रामोद्योग

आयोगाचे अध्यक्ष मनोज कुमार यांनी सांगितलं. ही सवलत ३० नोव्हेंबर पर्यंत लागू राहील. खादी क्षेत्रातला व्यवसाय गेल्या आर्थिक वर्षामध्ये एक लाख ५५ कोटी रुपयांवर गेल्याचं कुमार यांनी सांगितलं.

****

साखर कारखान्यांच्या एफआरपी प्रमाणे साखरेचा किमान हमीभाव वाढवण्याचं आश्वासन केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी दिल्यामुळे उसाला चांगला दर देणं शक्य होईल, असं उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले. सातारा जिल्हा बँकेच्या अमृत महोत्सवाच्या सांगता समारंभात ते बोलत होते. सहकार हा विकासाचा पाया असल्याचंही पवार यांनी यावेळी नमूद केलं.

****

राज्यातल्या धर्मादाय कार्यालयाचं काम कौतुकास्पद असून, या विभागानं अधिकाधिक लोकाभिमुख कामं करावीत, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. उपमुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्ष, धर्मादाय रुग्ण योजनेसाठीची ऑनलाईन प्रणाली आणि रुग्णांकरता उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहायता हेल्पलाईनचं उद्घाटन काल फडणवीस यांच्या हस्ते मुंबईत झालं, त्यावेळी ते बोलत होते. उपमुख्यमंत्री वैद्यकीय सुविधा सहायता हेल्पलाईन विषयीची माहिती १८०० १२३ २२११ या क्रमांकावर २४ तास उपलब्ध होणार आहे.

****

वस्त्रोद्योग गुंतवणुकीसाठी राज्यशासनाच्या उद्योग विभागाने ओ फए बी टेक प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीशी काल सामंजस्य करार केला. या कराराच्या माध्यमातून वर्धा जिल्ह्यातल्या कारंजा इथं साडे सातशे कोटी रुपये गुंतवणूक होणार आहे. यातून सुमारे १५ हजार रोजगार उपलब्ध होतील, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

****

आगामी निवडणुकीत ओबीसी समाजाने साथ दिली तर वंचित बहुजन आघाडीला तीन आकडी जागा मिळतील, असा विश्वास वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केला आहे. ते मनमाड इथं आदिवासी सत्ता संपादन परिषदेच्या वेळी बातमीदारांशी बोलत होते. मराठा समाजाला इतर मागासवर्गीय प्रवर्गात आरक्षण देऊ नये, या मागणीला वंचित बहुजन आघाडीनं पाठिंबा जाहीर केला आहे. आदिवासी आणि ओबीसीं समूहांना एकत्र करून तिसरी आघाडी

स्थापन करणार असून, नागपूरला या तिसऱ्या आघाडीच्या नावाची अधिकृत घोषणा करू असं ते म्हणाले.

****

बदलापूर लैंगिक अत्याचार घटनेचा आरोपी अक्षय शिंदेच्या मृत्यू प्रकरणाची चौकशी करण्यासाठी राज्य सरकारनं, माजी नायमूर्ती दिलीप भोसले यांच्या नेतृत्वाखाली एक सदस्यीय न्यायालयीन आयोग स्थापन केला आहे. अक्षय शिंदेच्या मृत्यूच्या वेळी पोलिसांची कारवाई योग्य होती, की नाही याचा तपास हा आयोग करेल. २३ सप्टेंबरला पोलिसांनी स्वसंरक्षणार्थ केलेल्या चकमकीत अक्षय शिंदेचा मृत्यू झाला होता.

****

नांदेड जिल्ह्यात किनवट तालुक्यातल्या शिवणी बामणी, डोंगरगाव शिवारात पोलिसांनी दोन दिवस कारवाई करत सव्वा नऊ क्विंटल गांजा जप्त केला. दोन ठिकाणी केलेल्या या कारवाईत ४६ लाख २२ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, सात जणांविरुद्ध अंमली पदार्थ कायद्यान्वये किनवट ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

****

सोलापूर – मंगळवेढा राष्ट्रीय महामार्गावर कामती इथं एक पिकअप व्हॅन रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्ड्यात पलटी होऊन झालेल्या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला, तर सहा जण जखमी झाले. तुळजापूरहून मंगळवेढा तालुक्यातल्या गोणेवाडी इथं देवी ची ज्योत घेवून जात असताना आज सकाळी हा अपघात झाला.

****

खो –खो या देशी खेळाची पहिली विश्वचषक स्पर्धा पुढच्या वर्षी भारतात होईल, असं भारतीय खो– खो महासंघ आणि आंतरराष्ट्रीय खो– खो महासंघानं जाहीर केलं. ५४ देशांमध्ये हा खेळ खेळला जातो, या स्पर्धेत मात्र २४ देशांतले प्रत्येकी १६ पुरुष आणि महिला संघ सहभागी होणार आहेत.

****